# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### श्रीरामपूर (जि.अहमदनगर) तालुक्यातील गोदावरी नदीकाठच्या गावांना नवीन गावठाण मंजूर करण्याबाबत

**(१) ५००१९ (२७-०१-२०२३). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपूर (जि.अहमदनगर) तालुक्यातील मौजे मातुलठाण, सरला गोवर्धन, महाकालवडगाव कमालपूर, खानापूर, भामाठाण आदि गोदावरी नदीकाठच्या पूररेषा नियंत्रण रेषेमधील गावांना नवीन गावठाण मंजूर करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९७२ मध्ये किंवा त्या दरम्यान जिल्हाधिकाऱ्यांमार्फत वरील सर्व गावांसाठी जमीन संपादन करण्यात आलेली असून सरला - २६७ गोवर्धन - ३२८, भामाठाण -३३८, महाकालवडगाव -४१६, कमालपूर- ११४, खानापूर - १६३ आणि मातुलठाण- ३३८ एवढ्या मोठ्या संख्येने पात्र लाभार्थी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा पुनर्वसन अधिकारी व तहसीलदार, श्रीरामपूर यांनी संपादित गावठाणामध्ये भूखंड पाडून सर्व लाभार्थ्यांना भूखंडाचे वाटप केलेले नसल्यामुळे अद्यापही अनेक लाभार्थी जुन्याच गावात धोकादायक स्थितीमध्ये वास्तव्यास असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लाभार्थ्यांच्या नावे भूखंड / जमीन नसल्याने शेकडो लाभार्थ्यांना घरकुले मंजूर होऊनही रद्द होत असणे, शाळा, अंगणवाडी, पाणीपुरवठा योजना अशा सार्वजनिक अत्यावश्यक सुविधा पासून ग्रामस्थ वंचित राहत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, गोदावरी नदीकाठच्या पूररेषा नियंत्रण रेषेमधील गावांना शासनाने भूखंड देण्याबाबत तसेच भूखंड वाटप करण्यास विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (०६-११-२०२३) :** (१) होय

(२) होय

(३) पुनर्वसनासाठी गावठाण संपादीत करुन त्यामध्ये भूखंड पाडण्यात आले आहेत. सदर ठिकाणी काही लाभार्थी राहतात. परंतु काही लाभार्थी पुनर्वसित ठिकाणी जाण्यास तयार नसल्याने ते जुन्याच गावात धोकादायक स्थितीत राहतात ही बाब खरी आहे.

(४) घरकुलाचे लाभार्थी हे गोदावरी नदीच्या काठावरील पुररेषेतील नसल्याने त्यांना पुर रेषेतील ग्रामस्थांच्या पुनर्वसनासाठी संपादीत जागेतील भूखंड घरकुलासाठी देय होत नाही.

पुनर्वसित नवीन गावठाणात शाळा, अंगणवाडी, पाणीपुरवठा योजना अशा अत्यावश्यक नागरी सुविधा उपलब्ध आहेत.

(५) सदर प्रकरणी विलंब झालेला नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्ह्यात फळबाग लागवडीला प्रोत्साहन देण्याबाबत

**(२) ५१५१७ (२३-०१-२०२३). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील हवामान फळबागांसाठी पोषक असून अनेक शेतकरी फळबाग लागवडी करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त फळांना बाजारात असलेली दराची हमी, कमी असलेला उत्पादन खर्च तसेच पुणे-मुंबईसह हैद्राबाद बाजारपेठेत होत असलेल्या मागणीमुळे तेथील शेतकरी मोठ्या प्रमाणात फळबाग लागवड करीत असल्याने फायदेशीर ठरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने जत तालुक्यातील शेतकऱ्यांना फळबाग लागवडीसाठी मार्गदर्शन, प्रोत्साहन व अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०८-११-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत रुपये १६८.४१ लाख एवढे अनुदान अदा करण्यात आलेले आहे. तसेच सदर योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना शेतीशाळा, गांव बैठक, प्रशिक्षण व इतर माध्यमाव्दारे फळबाग लागवडीबाबत मार्गदर्शन केले जात आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत जत तालुक्यात २०५ हे.लागवड करण्यात आली असून सध्या भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजने अंतर्गत ऑनलाईन लॉटरीने निवड झालेल्या शेतकऱ्यांच्या अर्जाची छाननी करुन पूर्वसंमती देण्याचे काम सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोंदिया जिल्ह्यातील वन्य प्राण्यांमुळे पिकांचे तसेच घरांचे नुकसान झाल्याबाबत

**(३) ५३०३६ (२४-०१-२०२३). श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्व विदर्भातील नवेगाव-नागझीरासारख्या व्याघ्र प्रकल्पातील वन क्षेत्राने व्यापलेल्या गोंदिया जिल्ह्यातील वनालगतच्या शेतामधील पिकांचे तथा गावांमधील घराचे वन्यप्राणी नुकसान करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांनी वन्यप्राण्यांमुळे होत असलेल्या नुकसानीबाबत स्थानिक वन विभागाकडे दिलेल्या तक्रारींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, वनविभागातर्फे नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे काय, त्यानुसार नुकसान भरपाई देण्याचे निकष काय आहेत, तसेच आतापर्यंत किती नुकसान ग्रस्तांना भरपाई देण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३१-१०-२०२३) :** (१), (२) व (३) गोंदिया जिल्ह्यातील नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाचे बफर क्षेत्र हे गोंदिया प्रादेशिक वनविभाग व गोंदिया प्रकल्प विभाग, वनविकास महामंडळ यांच्या नियंत्रणाखाली आहे. सदर क्षेत्रासभोवताल वन्यप्राण्यांमुळे शेतपिक नुकसानीच्या सन २०२०-२१ मध्ये १५६४, सन २०२१-२२ मध्ये ४२९० व सन २०२२-२३ मध्ये २७४१ प्रकरणे निदर्शनास आली आहे. सदर प्रकरणांमध्ये प्रचलित नियमातील तरतुदीनुसार संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अनुक्रमे रु. १५३.८७ लक्ष, रु. ३०९.४५ लक्ष व रु. १९९.२९ लक्ष रक्कम अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शेततळे अस्तरीकरणाबाबतचे अनुदान व कागद खरेदीस परवानगी मिळण्याबाबत**

**(४) ५३३५५ (२४-०१-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाकडून शेतकऱ्यांना शेततळयास अस्तरीकरणाबाबत पूर्वी चालू आर्थिक वर्षांमध्ये घेतलेल्या कागदास अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत शेतकऱ्यांना अनुदान देण्यात येत नसून शासनाच्या लकी ड्रा (सोडत) मध्ये शेततळे मंजूर झाल्यानंतर कागद खरेदी करावा तसेच पाणी उपलब्ध असते तेव्हाच कागद वापरावा असे शेतकऱ्यांना कृषी विभागामार्फत सांगण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शेततळयात पाणी उपलब्ध असते तेव्हाच कागदाचा वापर करुन त्याची पाच वर्षांची गॅरंटी व वॉरंटी असते हे लक्षात घेता, शेतकऱ्यांना पूर्वीप्रमाणे अस्तरीकरणाबाबत अनुदान देण्यात यावे व चालू आर्थिक वर्षांमध्ये कागद खरेदी करण्याबाबत परवानगी देण्यात यावी व खरेदी केलेल्या कागदास मान्यता देण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी शासनाकडे केल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे तसेच कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१०-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४)एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान व राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत वैयक्तिक शेततळे अस्तरीकरण या घटकासाठी महाडीबीटी पोर्टलवर निवड झालेल्या लाभार्थ्यांच्या पुर्वसंमती पुर्वीच्या देयकांना मान्यता देण्यात येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नंदुरबार जिल्ह्यातील दादासाहेब माणिकरावजी गावित नागरी सहकारी पतसंस्था, नवापूर मध्ये झालेला गैरव्यवहार**

**(५) ५४८५० (२७-०१-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यातील जिल्हा उप निबंधक सहकार संस्था, नंदुरबार यांच्या अधिपत्याखाली दादासाहेब माणिकरावजी गावित नागरी सहकारी पतसंस्था, नवापूर मधील ज्या सभासदांनी मुदत ठेव योजनेमध्ये रक्कम गुंतविली अशा ठेवीदारांना त्यांच्या ठेवींची मुद्दल रक्कम व व्याजासहित रक्कम परत करण्यास विलंब करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेचे लेखापरीक्षण कोणत्या वर्षापर्यंत करण्यात आले आहे ,

(३) असल्यास, याप्रकरणी जिल्हा उप निबंधक सहकार संस्था, नंदुरबार यांनी तक्रार प्राप्त झाल्यानंतर सदर संस्थेविरुद्ध तसेच संस्था ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यास सक्षम नसल्यास त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (३०-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) दादासाहेब माणिकरावजी गावित नागरी सहकारी पतसंस्था मर्या., नवापूर या पतसंस्थेचे दि. ३१ मार्च, २०२३ पर्यंत लेखापरीक्षण झाले आहे. लेखापरीक्षण अहवालात पतसंस्थेबाबत कोणतेही गंभीर आक्षेप नमुद नाहीत.

पतसंस्थेतील ठेवीदारांना त्यांच्या ठेवीच्या रक्कमा मिळत नसल्याबाबतच्या कुठल्याही तक्रारी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे, जिल्हा उपनिबंधक कार्यालय, नंदुरबार तसेच सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, नवापूर, जि. नंदुरबार या कार्यालयांस प्राप्त नाहीत.

पतसंस्थेतील ठेवीदारांना त्यांच्या मुदत संपलेल्या ठेवींच्या रक्कमा नियमितपणे परत करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आर्वी-आष्टी-कारंजा (जि.वर्धा) येथील बोर व्याघ्र प्रकल्पातील गावांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(६) ५५०६२ (२९-०१-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी-आष्टी-कारंजा (जि.वर्धा) येथील विधानसभा मतदार संघाला लागून असलेल्या बोर व्याघ्र प्रकल्पातील असलेल्या हिंसन प्राण्याचे जसे वाघ व अस्वल यांच्या हल्ल्यामुळे या भागातील १२ ते १५ नागरिकांना जीव गमवावा लागला असून जवळपास ४०० जनावरे मृत्युमुखी पडले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मौजा माळेगांव ठेका, मेटहिरजी, उमरविहिरी, ऐनीदोडका, मरकसुर या गावाची पुनर्वसन करण्याबाबतची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वाघाच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या कुटुंबातील एका व्यक्तीस शासकीय सेवेत समाविष्ट करुन घेण्याबाबत तसेच बोर व्याघ्र प्रकल्पालगत असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतीला १००% अनुदानावर सौर ऊर्जा कुंपण देण्यात यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणा संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३१-१०-२०२३) :** (१) नागपूर वनवृत्तातील वर्धा वनविभागांतर्गत आर्वी-आष्टी-कारंजा येथे सन २०२२-२३ मध्ये वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात ३ व्यक्तींचा मृत्यु झाल्याचे निदर्शनास आले आहे. प्रस्तुत प्रकरणांमध्ये प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार मृत व्यक्तीच्या वारसास अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

तसेच सन २०२२-२३ (माहे जानेवारी) मध्ये वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात पशुधन हानीच्या ३४२ घटना निदर्शनास आल्या आहेत. प्रस्तुत प्रकरणांमध्ये प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार पशुधनाच्या मालकास अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

(२) सदर गावे बोर व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रामध्ये समाविष्ट असून त्यांना अभयारण्यामध्ये समाविष्ट करुन पुनर्वसन करण्याची मागणी होत आहे. त्या अनुषंगाने सदर गावांचे पुनर्वसन करण्यासाठी लागणारी आर्थिक तरतूद याबाबत सुधारीत अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत शासन स्तरावर निर्णय घेणे अपेक्षित आहे.

(३) वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत व्यक्तीच्या वारसास शासन सेवेत सामावून घेण्याचे कोणतेही शासन धोरण नाही.

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेंतर्गत वर्धा वनविभागातील ३५ गावातील ३४२ सन २०१९-२० मध्ये व सन २०२०-२१ मध्ये ३९४ असे एकूण ७३६ लाभार्थांना सौर कुंपण उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्यात कृषी विभागामार्फत शेततळ्यासाठी अनुदान प्राप्त झाले नसल्याबाबत**

**(७) ५५६८७ (२९-०१-२०२३). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृषी विभागामार्फत सन २०१४-२०१५ या कालावधीमध्ये परवानगी घेऊन केलेल्या शेततळ्यासाठी अद्यापपर्यंत अनुदान प्राप्त झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित शेतकऱ्यांना केव्हा अनुदान देण्यात येणार आहे ,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०८-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.

राज्यात एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान या योजनेंतर्गत सन २०१४-१५ या वर्षामध्ये एकुण ११७१ सामुहिक शेततळयाचा भौतिक कार्यक्रम व रु. २३००.०० लाख रक्कमेचा आर्थिक कार्यक्रम मंजूर करण्यात आला होता.

त्यातील सर्व सामुहिक शेततळयांचा भौतिक व आर्थिक कार्यक्रम पूर्ण झाला असुन परवानगी घेऊन केलेल्या सामुहिक शेततळयासाठीचे अनुदान प्रलंबित नाही.

(२), (३) व ( ४ ) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंप्री सद्दोद्दीन (ता.इगतपुरी जि.नाशिक) येथील आदिवासी विकास विभागाच्या क्रीडा प्रबोधिनीचे काम सुरु करण्याबाबत**

**(८) ५७१४१ (२७-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंप्री सद्दोद्दीन (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील गट न.२८१,२८२,२८५,२८९ एकूण क्षेत्र २१.०८ हे.आर पैकी १८.७३ या क्षेत्रावर आदिवासी विकास विभागाची क्रीडा प्रबोधिनीचे काम करण्यासाठी सुधारित अंदाजपत्रकासह शासनास प्रस्ताव पाठविण्याबाबत दिनांक २४ एप्रिल २०२२ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे झालेल्या बैठकीत शासनाने निर्णय घेवूनही माहे जानेवारी २०२३ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे सदर प्रस्ताव प्राप्त झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या दिरंगाईबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशीत काय आढळून आले व चौकशी अहवालाच्या अनुषंगाने शासनाने जबाबदारी निश्चित करुन सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (३१-१०-२०२३) : (**१) होय, खरे आहे.

क्रिडा प्रबोधिनीचे नकाशे व आराखडे मंजुरी करीता उपविभागाने पत्र क्रमांक प्रशा/१७५/२०२२ दि.०३/०६/२०२२ अन्वये प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक यांना सादर केले होते. तसेच अंदाजपत्रके विभागीय कार्यालयाचे पत्र जा.क्र. प्रशा / ३७८२ / सन २०२२ दि.०८/१२/२०२२ अन्वये प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प नाशिक यांना प्रशासकीय मान्यतेस्तव सादर करण्यात आले होते. मा.मुख्य अभियंता यांनी सुचित केल्यानुसार बांधकाम नकाशे व तरतुदी क्रिडा विभाग व मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांचेकडुन तपासुन व साक्षांकित करुन घेण्यात आले असून खेळांच्या मैदानाचे क्षेत्रफळ व इतर तरतुदी क्रिडा अधिकारी यांचे कडुन अंतिम करुन घेण्यात आले आहेत. उक्त अंदाजपत्रकात सुचित केल्यानुसार त्रुटीपुर्तता करुन विभागीय कार्यालयाचे पत्र जा.क्र. प्रशा / १७७१ / सन २०२३ दि.२१/०४/२०२३ अन्वये प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक कार्यालयास फेरसादर करण्यात आली आहेत. सद्यस्थितीत सदर अंदाजपत्रके प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक यांनी पत्र क्र. ५७४५ दि. ०६/०७/२०२३ अन्वये अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक विभाग, नाशिक कार्यालयास पुढील कार्यवाहीसाठी सादर केली आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सागरेश्वर (जि.सांगली) येथील वन्यजीव अभयारण्यात दोन हरणांचा मृत्यू झाल्याबाबत

**(९) ५९०८८ (१९-०४-२०२३). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सागरेश्वर (जि.सांगली) येथील वन्यजीव अभयारण्यातील दोन हरणांचा मृत्यू झाल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा पलुस कडेगाव तालुक्यातील सामाजिक संघटना व शेतकरी यांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३१-१०-२०२३) :**(१) सागरेश्वर वन्यजीव अभयारण्यातील नियतक्षेत्र सागरेश्वर पूर्व येथे दिनांक २८.१२.२०२२ रोजी एक मृत सांबर आढळून आले आहे. सदर सांबराचा मृत्यु हा नैसर्गिकरित्या झाल्याचे शवविच्छेदन अहवालात नमूद करण्यात आले आहे. (२) होय हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्न उदवभत नाही.

---

### कोकणातील सावंतवाडी व दोडामार्ग तालुक्यातील सुपारी पिकावर गळ रोगाचा प्रादुर्भाव झाल्याबाबत

**(१०) ५९८२५ (१९-०४-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील सावंतवाडी व दोडामार्ग तालुक्यातील ७० टक्के सुपारी पिकावर गळ रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने सुपारी बागायतदार आर्थिक संकटात सापडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन सुपारी बागायतदारांना कोणत्या प्रकारची मदत करण्यात आली वा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१०-११-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

माहे जुलै-ऑगष्ट, २०२२ मध्ये जिल्ह्यात सततच्या पावसामुळे व अतिवृष्टीमुळे सुपारी पिकाची कोवळी फळे कोळे रोगाच्या प्रादुर्भावाने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी, दोडामार्ग या तालुक्यासह देवगड, मालवण,

वेंगुर्ला व कुडाळ या तालुक्यातील सुपारी लागवडीखालील क्षेत्र बाधित झाले आहे.

(२) बाधित क्षेत्राचे क्षेत्रीय स्तरावर संयुक्त पंचनामे पूर्ण करण्यात आले असून सुपारी पिकाची ३३ टक्के पेक्षा जास्त व ३३ टक्केपेक्षा कमी बाधित क्षेत्राची तालुकानिहाय माहिती जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,

सिंधुदुर्ग यांनी दिनांक ०५.०१.२०२३ च्या पत्रान्वये मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचेकडे पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चाकूर (जि.लातूर) येथे वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत कृषी व्यवसाय व्यवस्थापन संस्थेत २१ शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत

**(११) ६०३३३ (२१-०४-२०२३). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकूर (जि.लातूर) येथील वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषी व्यवसाय व्यवस्थापन संस्थेत २१ शिक्षकांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे केव्हापासून रिक्त आहेत व ती रिक्त राहण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या संस्थेत ७० विद्यार्थी शिक्षण घेत असून ४१ शिक्षकांपैकी २१ पदे रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर विपरित परिणाम होत असल्यामुळे रिक्त असलेली पदे भरण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना वा कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०३-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर पदे सन २०१३ पासून रिक्त आहेत. सदर पदे सरळसेवेने भरावयाची होती. सदर शिक्षकवर्गीय पदांची शैक्षणिक पात्रता व अनुभव अंतिम झालेला नसल्यामुळे, तसेच, वित्त विभागाचे पदभरती संदर्भात निर्बंध असल्यामुळे पदभरती प्रक्रिया होवू शकली नाही.
(३) शिक्षकवर्गीयांच्या शैक्षणिक अर्हतेबाबत / पात्रतेसंबंधित विद्यापीठ परिनियमात शैक्षणिक पात्रतेत बदल होण्यासाठी परिनियमात दुरूस्ती दि.३०.०६.२०२३ रोजीच्या अधिसूचनेन्वये करण्यात आली आहे. वित्त विभाग, शासन निर्णय दि. ३१.१०.२०२२ अन्वये पदभरतीसंदर्भात असलेले निर्बंध शिथील करण्यात आले असून तद्नुषंगाने सदर पदे भरण्यासाठी शिक्षकवर्गीय संवर्गनिहाय पदांच्या बिंदूनामावलीस शासन स्तरावरून मंजूरी देण्यात आली असून पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**स्व.भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेत केळी पिकाचा समावेश करण्याबाबत**

**(१२) ६२५३१ (२०-०४-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्व.भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेत केळी पिकाचा समावेश करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१०-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) स्व. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेंतर्गत बहुवार्षिक फळबागांच्या लागवडीसाठी अर्थसहाय्य अनुज्ञेय करण्यात आले आहे. केळी हे बहुवार्षिक फळपिक नसल्याने केळी पिकाचा समावेश स्व. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेत करता येणार नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात हळद संशोधन प्रकल्प सुरु करण्याबाबत**

**(१३) ६३५२६ (१२-०५-२०२३). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसमत (जि.हिंगोली) तालुक्यात ६६ एकर जागेवर सुरु करण्यात आलेला बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन केंद्र सुरु करण्याबाबत शासनाकडून ११ कोटीच्या निधीची तरतुद करुनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेवर प्रगत बाजार संकुलाला ही मान्यता देण्यात आल्याने शासनाकडून दोन प्रकल्पांसाठी एकाच जागेची निवड करण्यात आल्याने मा.न्यायालयाने सदर जागेबाबत जैसे थे आदेश देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दोन्ही प्रकल्प शासनाने जाहीर केले असल्याने याप्रकरणी शासनाने चौकशी करुन त्याअनुषंगाने रोजगाराच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या हळद पिकाच्या संशोधनासाठी तसेच शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या संशोधन केंद्राला मान्यता देवून प्रगत बाजार संकुलासाठी अन्य जागेचा पर्याय उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०७-११-२०२३) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाने याबाबतचे सर्व अपील रद्द केले आहेत..

(३) सदरील जागेवर शासनाने शेतकऱ्यांच्या रोजगाराच्या दृष्टीने महत्वाचा असलेला हळद पिकाच्या संशोधन केंद्रासाठी दि. १४.०९.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे. प्रगत बाजार संकुलासाठी अन्य जागेचा पर्याय उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, हिंगोली यांना पाठविण्यात आलेला आहे..

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सडक-अर्जुनी (जि.गोंदिया) नगरपंचायत क्षेत्रातील वन जमिनीवरील अतिक्रमण नियमित करण्याबाबत**

**(१४) ६३६४२ (२१-०४-२०२३). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सडक-अर्जुनी (जि.गोंदिया) नगरपंचायत क्षेत्रातील वन जमिनीवरील अतिक्रमण नियमित करण्यासाठी वनसंवर्धन अधिनियम, १९८० अन्वये वन विभागास प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हाधिकारी यांनी विविध शिफारशीसह प्रस्ताव वन विभागास सादर करुन जिल्हाधिकारी यांचेकडून प्रस्ताव शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने रहिवाशी प्रयोजनाकरिता नियमित करण्याच्या प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-१०-२०२३) :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे. मुख्याधिकारी, नगर पंचायत कार्यालय, सडक अर्जुनी यांनी मौजे सडक अर्जुनी येथील वन जमिनीवर असलेले अतिक्रमण नियमितीकरण करण्याकरीता वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत सादर केलेल्या प्रस्तावात त्रुट्या असल्याने, सदर त्रुटींची पुर्तता करण्याबाबत उपवनसंरक्षक, गोंदिया यांनी मुख्याधिकारी, नगर पंचायत, सडक अर्जुनी, गोंदिया यांना दिनांक ३०.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दापचरी वरखंडा (ता. डहाणू, जि. पालघर) येथील शाळेच्या निकृष्ट बांधकामाबाबत**

**(१५) ६४६१८ (१०-१०-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशात ५० ठिकाणी एकलव्य मॉडेल रेसिडेन्सियल स्कुलचे (ईएमआरएस) दिनांक १५ नोव्हेंबर, २०१९ रोजी मा. पंतप्रधान यांच्या हस्ते व्हर्च्युअल पध्दतीने भुमिपुजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामध्ये अमरावती, गडचिरोलीसह पालघर जिल्ह्यातील दापचरी येथील (ता. डहाणू) निवासी स्कूलचा समावेश करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दापचरी वरखंडा (जि. पालघर) येथील १० एकर परिसरात आधुनिक दर्जाच्या इमारती उभारुन सीबीएसई दर्जाचे शिक्षण दिले जाणार असून त्यासाठी त्यातील दोन इमारती बांधकामाचे कंत्राट सुरत (गुजरात राज्य) येथील एम.बी. बाबरिया या कंत्राटदारास रुपये १८ कोटी रक्कमेचा ठेका देण्यात आला असल्याचे दि. १० एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर ठेकेदाराने इमारती उभारतांना कामाच्या दर्जाकडे दुर्लक्ष केल्याने इमारती पुर्ण होण्याआधीच स्लॅबला तडे गेल्याचे व इमारत बांधकामास १४ महिन्यांचा कालावधी दिलेला असतानाही काम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात घालणाऱ्या ठेकेदाराच्या संपुर्ण कामाचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन चौकशी करण्याची मागणी तेथील ग्रामस्थांनी, संबंधित स्थानिक शिक्षणाधिकारी मा. जिल्हाधिकरारी, पालघर व शासनाकडे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली असतांना अद्याप कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (०६-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) एकलव्य मॉडेल रेसिडेंशीयल शाळा, दापचरी वरखंडा (ता. डहाणू जि. पालघर) येथील इमारत बांधकामांची मुख्य अभियंता,बांधकाम व्यवस्थापन कक्ष, यांच्यामार्फत स्थळ पाहणी करण्यात आली असून सदरील बांधकामाचा दर्जा प्रथमदर्शनी समाधानकारक असल्याचे त्यांनी दिनांक ०३.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. मात्र काही ठिकाणी स्लॅबला Shrinkage Cracks असल्याने Non Destructive Testing करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे त्यांनी कळविले आहे. तसेच हे Cracks असले तरी ते RCC Frame Structure ला अपायकारक नसल्याचे मत देखील त्यांनी दिले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे देऊर खुर्द (ता.जि.धुळे) येथील शेतकऱ्यास कृषी व अन्नप्रक्रिया योजनेंतर्गत अनुदान मिळण्याबाबत**

**(१६) ६४८६० (२७-०८-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे देऊर खुर्द (ता.जि.धुळे) येथील शेतकरी श्री.अमर शिवाजीराव देसले यांनी कृषी विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री कृषी व अन्नप्रक्रिया योजनेंतर्गत अर्थसहाय्यासाठी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, धुळे येथे अनुदानासाठी सन २०२०-२१ व २०२१-२२ या कालावधीत प्रस्ताव सादर केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावास तांत्रिक बाबींच्या आधारे नामंजूर करण्यात आल्याचे माहे मे, २०२३ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शेतकऱ्यांनी शिवपुष्प ॲग्रो प्रॉडक्ट अंतर्गत ऊसापासून गुळ निर्मिती करण्याचा प्रकल्प शेतजमिनीवर बँकेचे कर्ज घेऊन उभारलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शेतकऱ्यांच्या प्रस्तावाचा फेरविचार करुन मंजुरी देऊन अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०७-११-२०२३) :**(१) होय.
(२) नाही.
(३) होय.
(४) सन २०१८-१९ व २०१९-२० मधील विहीत कालमर्यादेनंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावांस मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबरनाथ (जि.ठाणे) येथे सहकारी उपनिबंधक कार्यालयासाठी शासकीय जागेस प्रशासकीय मंजुरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१७) ६५८१६ (२५-०८-२०२३). श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील सहकारी उपनिबंधक कार्यालय हे भाड्याच्या इमारतीमध्ये असून वारंवार स्थलांतरित करावे लागत असल्याचे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उपनिबंधक कार्यालयासाठी शासकीय जागा व प्रशासकीय मंजुरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०३-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंबरनाथ कार्यालयाने तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबरनाथ यांचेकडे प्रशासकीय इमारतीत जागा उपलब्ध करुन देणेबाबत मागणी करण्यात आली होती. परंतु प्रशासकीय इमारतीत जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून शासकीय इमारत उपलब्ध नसल्याचा दाखला दिनांक २५.५.२०२२ रोजी घेण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंद्राक खरेदीसाठीचे नवे जाचक नियम शिथील करण्याबाबत.

**(१८) ६६१९५ (२९-०८-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई अप्पर मुद्राक नियंत्रक यांच्या आदेशानुसार नागरिकांनी मुद्रांक खरेदी करतांना स्वत: उपस्थित राहून स्वाक्षरी करावी लागणार असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या या आदेशाने ऑनलाईन कामकाजाच्या युगात नागरिकांना सरकारी कार्यालयात फेऱ्या मारावे लागणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त आदेशाचा शासनाने फेरविचार करावा यासाठी मुद्रांक विक्रेत्यांनी संपाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने या परिपत्रकांचा आढावा घेवून त्यातील जाचक अटी मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०८-११-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

(२) सदर आदेशाचा शासनाने फेरविचार करावा यासाठी मुद्रांक विक्रेत्यांनी संपाचा इशारा दिलेला होता, ही बाब खरी आहे.

तथापि, नागरिकांच्या सोईसाठी ई-पेमेंट(e-Payment) ई.एस.बी.टी.आर. (e-SBTR) फ्रँकिंग, ई-चलन व मुद्रांक पेपर या सुविधा उपलब्ध असल्याने सर्वसामान्य नागरिक आता घरबसल्या सदर प्रणालीचा अवलंब करुन कोठुनही २४ x ७ ग्रास प्रणाली अथवा शासनाने प्राधिकृत केलेल्या बँकाव्दारे मुद्रांक शुल्क,नोंदणी फी अथवा इतर रकमांचा भरणा करता येऊ शकल्यामुळे नागरिकांना सरकारी कार्यालयात वारंवार जावे लागणार नाही.

(३) व (४) होय,हे खरे आहे.

अपर मुद्रांक नियंत्रक,मुंबई यांचे दि.७.९.२०२२ रोजीच्या आदेशातील मुंबई शहर व उपनगर जिल्हयातील मुद्रांक विक्रेत्यांना मुंबई शहर व उपनगर जिल्हयांव्यतिरिक्त इतर जिल्हयातील बँका, वित्तीय संस्था, कंपनी किंवा इतर आस्थापना यांना मुद्रांक विक्री करता येणार नाही याबाबत उक्त अधिनियमामध्ये व मुंबई मुद्रांक पुरवठा व विक्री नियम १९३४ मध्ये कोणतीही तरतुद नसल्याने नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाचे आदेश दि.५.४.२०२३ अन्वये अपर मुद्रांक नियंत्रक यांचे दि.७.९.२०२२ रोजीचे आदेश तात्काळ प्रभावाने रद्द करण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लोणार सरोवर (ता.लोणार, जि.बुलढाणा) गणपती मंदिरा मागील व परिसरातील ८६ हेक्टर जमिनीच्या भुसंपादनाबाबत.

**(१९) ६६७८७ (२५-०८-२०२३). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार सरोवराशेजारील (ता.लोणार, जि.बुलढाणा) गणपती मंदिरामागील व परिसरातील ८६ हेक्टर जमिन अधिग्रहीत करण्यात येत असून भूसंपादित जमिनीच्या प्रती एकरी ७२ लक्ष रूपये मोबदला देण्याची मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे ५४ शेतक-यांनी माहे मार्च व एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीसंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०९-११-२०२३) :** (१), (२) लोणार, ता.लोणार, जि. बुलढाणा येथील लोणार सरोवराशेजारील गणपती मंदिरामागील व परिसरातील ८६.९६ हेक्टर जमीन भूसंपादन अधिनियम, २०१३ नुसार संपादन करण्याची कार्यवाही चालू आहे. सदर जमिनीकरीता प्रति एकरी रु. ७२.०० लक्ष इतका मोबदला देण्याची मागणी भूधारक /शेतक-यांनी माहे मार्च-एप्रिल, २०२३ दरम्यान उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी मेहकर यांचेकडे केली. परंतु सदर मोबदला मागणी अवाजवी असल्यामुळे अमान्य करण्यात आली व भूसंपादन प्रक्रिया पुढे चालू ठेवून कलम ११ (१) व १५ (२) ची अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली. तसेच कलम १९ (१) नुसार पुढील कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात परभणी व नाशिक जिल्ह्यासह शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी सिबिल स्कोअरची अट राष्ट्रीयकृत व व्यापारी बँकाकडून घालण्यात आल्याबाबत

**(२०) ६६८२६ (२५-०८-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी राष्ट्रीयकृत व व्यापारी बँकाकडून सिबिल स्कोअरची अट घालण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) परभणी जिल्ह्यात मागील काही वर्षापासून अवकाळी पाऊस, गारपीट, सततचा पाऊस या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीचे उत्पादन घटल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात आल्यामुळे तसेच सिबिल स्कोअर चांगला नसल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना बँकांनी पीक कर्जापासून वंचित ठेवले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शेतकऱ्यांनी शासनाकडे तक्रार केली असता, शासनाने परिपत्रक काढून शेतकऱ्यांचे सिबिल स्कोअर न पाहण्याचे स्पष्ट केले असताना परभणी जिल्ह्यातील विविध बँकांकडून सदर आडमुठे धोरण कायम ठेवल्यामुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच येवला (जि.नाशिक) येथील शेतकऱ्यांकडील सक्तीची कर्जवसुली थांबविण्याच्या मागणीसाठी दिनांक २६ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास शेतकऱ्यांनी ठिय्या आंदोलन केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(५) त्याचप्रमाणे पीक कर्जासाठी राष्ट्रीयकृत बँकांकडे गेलेल्या शेतकऱ्यांचा सिबिल स्कोअर ६०० ते ७०० असेल तरच कर्ज देण्याची बँकांनी भूमिका घेतल्यामुळे शेतकऱ्यांची पिक कर्जासाठी अडवणूक होत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी करुन सिबिल स्कोअरबाबत काढलेल्या शासन परिपत्रकाची प्रभावी अंमलबजावणी तसेच शेतकऱ्यांकडून होणारी सक्तीची कर्जवसुली थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०८-११-२०२३) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) हे खरे आहे.
(५) हे खरे नाही.
(६) सन २०२१ व सन २०२२ मध्ये झालेल्या नैसर्गिक आपत्तीच्या नुकसानापोटी वाटप केलेल्या मदतीच्या रकमेतून कोणत्याही प्रकारची वसूली बॅंकांनी करु नये, अशा सूचना जिल्हाधिकारी, परभणी यांनी दि.३०.०८.२०२३ रोजीच्या District Level Review Committee च्या सभेमध्ये दिलेल्या आहेत. तसेच सहकार विभागाच्या दि. २८ जुन २०२३ रोजीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, परभणी यांनी दिलेल्या आहेत. त्याचप्रमाणे विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी गारपीटीमुळे पीक कर्ज भरण्यास असमर्थ असलेल्या अल्प भुधारक शेतकऱ्यांकडून कर्ज वसूलीसाठी सक्ती करण्यात येऊ नये, असे निर्देश दिले आहेत.

तसेच राज्यस्तरीय बॅंकर्स समितीच्या दि. २९.०५.२०२३ रोजीच्या सभेमध्ये उपस्थित असलेल्या बॅंक प्रतिनिधींनी शेतकऱ्यांना पीक कर्ज मंजुर करताना संबंधित शेतकऱ्याची पत /पात्रता तपासणीसाठी विशिष्ट संख्येचा सिबिल स्कोअर विचारात घेतला जात नसल्याचे निदर्शनास आणून दिले आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील ३५५ गावांना पुराचा धोका असल्याने गावनिहाय आपत्ती व्यवस्थापन आराखडे तयार करण्याबाबत**

**(२१) ६७०२४ (२७-०८-२०२३). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगडा जिल्ह्यातील ३५५ गावांना पुराचा धोका निर्माण झाल्याने गावनिहाय आपत्ती व्यवस्थापन आराखडे तयार करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाने माहे मे, २०२३ मध्ये दिले आहेत, हे खरे आहे काय
(२) असल्यास, रायगड जिल्ह्यातील मोठ्या नद्यांना पावसाळ्यात नेहमी पूर येत असतो त्यामुळे परिसरातील घरांचे, शेतीचे व इतर मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असते त्यामुळे सदर जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (०३-११-२०२३) :** (१) होय हे अंशत: खरे आहे.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड अलिबाग यांनी दि.२०.०४.२०२३ रोजीच्या आदेशान्वये सन २०२३ साठी तालुक्याचा आपत्ती व्यवस्थापन आराखडा अद्यावत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(२) होय हे खरे आहे.

अतिवृष्टी समुद्रात असणारी भरती व धरणातून सोडण्यात येणारा विसर्ग या तीनही बाबी एकाच वेळी आल्यामुळे जिल्हयातील नद्यांना नेहमी पूर येतो. त्यामुळे परिसरातील घरांचे, शेतीचे व मालमत्तेचे मोठया प्रमाणात नुकसान होत असते. त्यामुळे सदर जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन करणे आवश्यक आहे

(३) रायगड जिल्ह्यातील तालुक्यातील दरडप्रवण गावे, पुरप्रवण गावे, याठिकाणी आपत्कालीन बाब उद्धवल्यास तात्पुरत्या स्थलांतरासाठी शाळा, समाजमंदीर इ. ठिकाणी पर्यायी व्यवस्था करण्यांत आली आहे. आपत्तीस तात्काळ प्रतिसाद देणेकामी गावनिहाय तलाठी, ग्रामविकास अधिकारी/ ग्रामसेवक, कृषी सहाय्यक /कृषी सेवक, कोतवाल, पोलीस पाटील, आपदा मित्र/सखी, स्थानिक स्वयंसेवी संस्थामधील सदस्य मिळून पथके स्थापन करण्यांत आली आहेत. तसेच कोणत्याही आपत्तीस तात्काळ प्रतिसाद देणेकामी जिल्हातील सर्व तहसिल कार्यालयांमध्ये २४x७ तास तालुका नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यांत आले आहेत. तालुक्यांतील शासकीय कार्यालये, लोक प्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था यांचे संपर्क क्रमाकांची अद्यावत पुस्तिका तयार करण्यांत आली आहे. या सर्व बाबी आराखड्यामध्ये समाविष्ट करून, तालुका आपत्ती व्यवस्थापन आराखडे अद्यावत करण्यात आले आहेत. पुर प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या दृष्टीने ता. महाड येथील सावित्री नदीतील गाळ काढणेबाबत कार्यवाही करण्यांत आली आहे. तसेच कोकण सौम्यीकरण प्रकल्पाअंतर्गत खार प्रतिबंधक बांध, समुद्र धुप प्रतिबंधक बांध, निवाराशेड, समुद्र धुप प्रतिबंधक बंधारा बांधणे इ. कामांबाबतचे प्रस्ताव शासनास सादर करण्यांत आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यात मागील चार ते पाच वर्षापासून कोतवाल यांना पदोन्नती न मिळाल्याबाबत

**(२२) ६७१७८ (२५-०८-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग परीपत्रक क्रमांक स३०/४२००/प्र.क्र.६३५/ई-१० दिनांक १९/०७/२००१ मध्ये कोतवालांना सेवेत घेण्यासाठी कमाल वयोमर्यादा ४० पर्यंत विहीत केलेली असल्याने व त्यांना गट- ड मधील पदावर नियुक्ती मिळण्याकरीता उच्चतम वयोमर्यादा ४५ पर्यंत शिथील करण्यात यावी असे नमुद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्हयातील कोतवालांना मागील ४ ते ५ वर्षांपासून पदोन्नती न मिळाल्यामुळे बऱ्याच कोतवालांचे वय ४५ वर्षे पुर्ण होण्यासाठी काही दिवस शिल्लक असल्यामुळे त्यांना पदोन्नती पासुन वंचित राहवे लागणार आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील ज्या कोतवालांचे वय ४५ वर्षे पुर्ण होण्यासाठी कमी दिवस आहेत त्यांना पदोन्नती देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी (केज मतदार संघ) यांनी राज्याचे महसूल मंत्री यांच्याकडे दिनांक १ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०८-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे,

(२) होय, हे खरे आहे,

(३) कोतवाल संवर्गातील कर्मचाऱ्यांना शिपाई संवर्गामध्ये प्रथम नियुक्तीकरीता ४०% कोटा राखीव ठेवण्यात आला असुन जेष्ठता यादीच्या अधिन शिपाई संवर्गामध्ये प्रथम नियुक्ती देण्यात येते.कोतवाल संवर्गाच्या जेष्ठता यादीच्या

अनुषंगाने रिट याचिका क्र.१६८९/२०२२ मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल असुन प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.उक्त प्रकरणाच्या अधिन राहून कोतवालांना शिपाई संवर्गामध्ये प्रथम नियुक्ती देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कृषी विद्यापीठांमध्ये ज्वारीवर संशोधन करण्यात येत असल्याबाबत

**(२३) ६७६८७ (२५-०८-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्रीमती सीमा महेश हिंरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मानवी आहारात ज्वारी हे आरोग्याच्या दृष्टीने गरजेचे असल्याने त्याचे महत्त्व वाढत असून महात्मा फुले, डॉ.पंजाबराव देशमुख व डॉ.वसंतराव नाईक या कृषी विद्यापीठांमध्ये ज्वारीवर संशोधन करण्यात येत असल्याचे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ज्वारीच्या आहारामुळे मानवी शरीराला फायदे होत असून त्यात किमान २८ प्रकारचे आजार दूर करण्याची क्षमता असल्याचे मत अन्नशास्त्र तंत्रज्ञ व्यक्त करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी ज्वारीच्या विविध वाणांवर संशोधन करतानाच या पिकावर येणाऱ्या रोगाचे नियंत्रण करुन रोगमुक्त ज्वारीचे वाण शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात देण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०२-११-२०२३) :** (१) होय, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी या कृषि विद्यापीठात ज्वारी या पिकावर संशोधनाचे कार्य करण्यात येत आहे.
(२) होय, हे खरे आहे.
ज्वारीतील विविध अन्न घटकांमुळे ज्वारी विविध रोगांवर उपचारात्मक उपयोगी ठरु शकते. तथापि, आजार दूर करण्यासंदर्भात ज्वारी आहाराबाबत कृषि विद्यापीठांमध्ये संशोधन झालेले नाही.
(३) राज्यात राष्ट्रीय अन्न व पोषण सुरक्षा अभियान ३१ जिल्हयात राबविण्यात येत आहे. आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षाच्या अनुषंगाने सन २०२२-२३ व २०२३-२४ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या अंतर्गत महाराष्ट्र मिलेट मिशन ३४ जिल्हयात राबविण्यात येत आहे. या अंतर्गत ज्वारीच्या लागवडीसाठी पिक प्रात्यक्षिके, बियाणे वितरण, शेत तिथे पौष्टिक तृणधान्य मिनिकीट, ह्या बाबी राबवून शेतकऱ्यांना ज्वारी पिकाचे बियाणे अनुदानावर/मोफत वितरीत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात सोलापूरात पहिली निसर्ग शाळा प्रकल्प येथील सिद्धेश्वर वनविहारात उभारण्याच्या दृष्टीने तयारी सुरु झाल्याबाबत

**(२४) ६७६९० (२४-०८-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सोलापूरात पहिली निसर्ग शाळा प्रकल्प येथील सिद्धेश्वर वनविहारात उभारण्यात येणार असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्ह्यात साधारणत: ५०० एकरावर निसर्ग शाळा उभारण्यात येणार असून नव्या पिढीला निसर्गाशी जोडण्याचा परिणामकारक प्रयत्न सुरु होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सिद्धेश्वर वनविहारात मोकळ्या जागेत वेगळे वन उद्यान विकसित करण्यासाठी दाट वन उद्यानात निसर्ग शाळा उभारुन पुढच्या पिढीला निसर्गाशी जोडण्याचे काम व्हावे अशी भूमिका निसर्गप्रेमींनी मांडली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पूर्वीच्या काळी दाट जंगलात ज्याप्रमाणे नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग करुन निसर्ग सानिध्यात गुरुकुल चालविण्याकरिता त्याचप्रमाणे वनविहाराची हरित लागवड करुन येथे मुलांना दररोज निसर्ग शाळेचा आनंद घेता यावा असा प्रयत्न केला जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना मा.वने मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिल्या असून त्यानुषंगाने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-११-२०२३) :**(१), (२), (३), (४) व (५) सोलापूर येथील सिध्देश्वर वनविहार येथे निसर्ग शाळा प्रकल्प न राबविता सोलापूरचे शुद्ध हवा देणारे केंद्र निर्माण व्हावे याकरीता तेथे वन उद्यानाची निर्मिती करीता प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना सोलापूर वनविभागास देण्यात आल्या आहेत. त्यानुसार सोलापूर वन विभागामार्फत वन उद्यानाचा प्रस्ताव महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचेकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## किन्हाळा, अरततोंडी, गांधीनगर व लाडज (ता. देसाईगंज, जि. गडचिरोली) या पुनर्वसीत गावांमध्ये मुलभुत नागरी सुविधा पुरविण्याबाबत

**(२५) ६७७११ (२४-०८-२०२३). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देसाईगंज (जि.गडचिरोली) तालुक्यातील वैनगंगा नदीला वारंवार येणाऱ्या पुरामुळे किन्हाळा, अरततोंडी, गांधीनगर व लाडज या पुरग्रस्त गावांचे सन १९९४ मध्ये नविन गावठाणात पुनर्वसन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गावांचे पुनर्वसन करतांना पुनवर्सन स्थळी कोणत्याही मुलभुत सुविधा पुरविण्यात न आल्याने ग्रामस्थांना गैरसोईचा तसेच घर बांधण्यासाठी देण्यात आलेल्या रु.१५ हजार रुपये कर्ज व त्यावरील व्याजाचा बोजा असल्याने कर्जबाजारी जिवन जगावे लागत असल्याची बाब माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पुनर्वसित गावांमध्ये २१ नागरी सुविधा पुरविण्याची मागणी दिनांक २८ मे, २०२३ रोजीच्या निवेदनानुसार केली असल्याने, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (०६-११-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) उक्त गावांमध्ये नागरी सुविधेची कामे पुर्ण झाली आहेत. उक्त गावापैकी किन्हाळा व अरततोंडी या गावातील बाधित कुटूंबांना पुनर्वसित ठिकाणी घर बांधणीसाठी रु.१५ हजार एवढे कर्ज शासनामार्फत देण्यात आले असून त्याची परतफेड अद्यापही करण्यात आलेली नाही.
(३) पुनर्वसित गावामध्ये १८ नागरी सुविधा देण्याची तरतुद असून सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करुन ज्या नागरी सुविधा शिल्लक आहेत त्याचा अहवाल जिल्हाधिकारी यांचेकडून मागविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती जिल्ह्यातील वनविभागात तक्रार निवारण समित्या कार्यान्वित करण्याबाबत

**(२६) ६७७१६ (२७-०८-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील वनविभागात काम करणाऱ्या महिलांच्या लैंगिक छळापासून संरक्षण या कायद्यान्वये तयार करावयाच्या तक्रार निवारण समित्या स्थापन करण्यात आल्या नसल्याचे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समित्या स्थापन न झाल्यामुळे समितीच्या बैठका व कोणताही निर्णय न घेतल्यामुळे तक्रार करण्यासाठी महिला येत नसून येथील महिला आजही असुरक्षित व भितीच्या वातावरणात काम करत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून उक्त समित्या कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती जिल्ह्यातील शेती व फळे आधारित प्रक्रिया प्रकल्प उद्योग आणण्याबाबत

**(२७) ६८००३ (११-०९-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात संत्रा व मोसंबी या फळपिकांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होत असतानाही येथे शेती उत्पादनावर आधारित प्रक्रिया प्रकल्पांची अनिश्चित स्थिती (वानवा) असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती व निर्णय घेवून येथे संत्रा व मोसंबी या फळपिकांना शेती उत्पादनावर आधारित प्रक्रिया उद्योग येण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०७-११-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) सद्यस्थितीत अमरावती जिल्ह्यात शासकीय अनुदानातून गट शेती अंतर्गत २ प्राथमिक प्रक्रिया उद्योग व मुख्यमंत्री अन्न प्रक्रिया योजनेतुन २ प्राथमिक प्रक्रिया उद्योग उभारण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळामार्फत एक संत्रा प्रक्रिया उद्योग कार्यरत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सन १९९१ च्या महापुरामध्ये (ता. वरुड, जि. अमरावतीत्र येथील ३१ गावांमधील खराब झालेल्या रस्त्यांबाबत**

**(२८) ६८३०१ (२५-०८-२०२३). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरुड (जि.अमरावती) येथे सन १९९१ मध्ये पावसाळयात आलेल्या महापुरात २८ गावे अंशतः व ३ गावे पुर्णत: बाधित झाल्यामुळे सदर गावातील प्रचंड प्रमाणात रस्ते, इमारती व शासकीय मालमत्तेचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अंशत: नुकसान झालेल्या २८ गावातील महापुरामुळे खरडून गेलेल्या रस्त्यांची त्यावेळी दुरुस्ती करण्यात आली होती परंतू सदर रस्ते आता अत्यंत खराब झालेले असल्यामुळे रस्ते दळणवळणा योग्य नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने माहिती घेऊन कायमस्वरुपी सिमेंट काँक्रीटचे रस्ते बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (०६-११-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे

सन १९९१ च्या पूरामुळे वरुड तालुक्यातील २८ गावे अशंत: व ३ गावे पुर्णत: बाधित झाले तथापि सदर गावातील रस्ते, इमारती व शासकीय मालमत्तेचे नूकसान झाले नाही.

(२) व (३) काही गावांमध्ये रस्त्यांची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत तपासणी करण्यात आली आहे. त्यानूसार विभागीय आयुक्तांमार्फत २६ पुनर्वसित गावातील अंतर्गत सीसी रस्ते बाबतचा रु.७६,३३,२९,२९१/- इतक्या रकमेचा प्रस्ताव प्राप्त झाला असून शासन मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे पळसवाडा, भापकी व हातुर्णा (ता. वरुड, जि. अमरावती) येथील पुरग्रस्तांचे पुर्नवसनामधील लाभार्थ्यांना घरबांधणीकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२९) ६८३०२ (२५-०८-२०२३). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पळसवाडा, भापकी व हातुर्णा (ता.वरुड, जि. अमरावती) येथील सन १९९१ मधील महापुरामुळे झालेल्या नुकसानीमुळे सदर गावातील कुटूंबाचे विशेष बाब म्हणुन पुरग्रस्तांचे पुर्णत: पुर्नवसन करण्याचा शासनाकडून निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावातील बाधित कुटुंबांना रु.१,६५,०००/- या प्रमाणे अनुदान उपलब्ध करुन दिल्यास त्यांना पुनर्वसीत ठिकाणी वाटप करण्यात आलेल्या जागेवर घर बांधण्याचे काम सुरु करण्यात येईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी घर बांधणीसाठी अनुदान उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (०६-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर गावातील पात्र बाधित कुटूंबांना प्रत्येकी घर बांधणीसाठी रु.१६५०००/- प्रमाणे रु.६,१०,५०,०००/- ची मागणी केली असून सदर मागणी नुसार प्रस्ताव शासन मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई (जि.पालघर) तालुक्यातील महसूल विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३०) ६८३८६ (२४-०८-२०२३). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील महसूल विभागातील ९६ मंजूर पदांपैकी ४५ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे विविध प्रकारचे दाखले, जमीनीविषयक कामे, अतिक्रमण कारवाया इ. कामे मोठ्या संख्येने प्रलंबित असून दैनंदिन कामकाजावर त्याचा विपरित परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेऊन सदर रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०८-११-२०२३) :** (१), (२) व (३) वसई तालुक्यासाठी महसूल विभागातील १४४ पदे मंजूर असून त्यापैकी ८० पदे भरण्यात आली असून ६४ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांच्या भरतीसंदर्भातील कार्यवाही करण्यात येत आहे. प्रशासकीय कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी, कार्यरत कर्मचा-यांकडे रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उंदरी (ता.केज, जि.बीड) येथील सेवा सहकारी संस्थेच्या लेखापरिक्षणाचा चुकीचा व अर्धवट अहवाल सादर केल्याबाबत

**(३१) ६८८४७ (२८-०८-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंदरी (ता.केज, जि.बीड) येथील सेवा सहकारी संस्थेत लेखापरिक्षणामध्ये १० दोषींवरती पुन्हा लेखापरिक्षण करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक यांनी दिनांक ०३ जानेवारी, २०२३ च्या आदेशान्वये श्री.एस.बी.देशमुख, लेखापरिक्षक (श्रेणी-२) सहकारी संस्था यांची लेखापरिक्षक म्हणून नियुक्ती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त लेखापरिक्षक यांनी दोषींना चुकीच्या उद्देशाने अर्धवट पूर्ण १० मुद्यांची चौकशी न करता अहवाल सादर केल्याची तक्रार निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात लेखापरीक्षणासाठी विहित केलेल्या पूर्ण १० मुद्यांची तपासणी न करता, कोणत्याही स्वरुपाचे त्यांचे स्पष्ट मत न नोंदवता, ठेवावयाच्या नोंदवह्या, खातेपुस्तक, परिशिष्ट याची तपासणी पडताळणी न करता अर्धवट व चुकीचा अहवाल दिल्याप्रकरणी संबंधितांवर कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दिनांक १५ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन शासनाने संबंधीत दोषीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०७-११-२०२३) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) श्री. एस. बी. देशमुख, लेखापरीक्षक श्रेणी-२, सहकारी संस्था, केज यांनी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित, उंदरी, ता. केज, जि. बीड या संस्थेचे चाचणी लेखापरीक्षण करताना परिशिष्ट ब मधील १ ते १० मुद्यांचे स्वतंत्र विवेचन करणे आवश्यक असताना एकत्रित विवेचन केले आहे. तथापि, सदर मुद्दे दोषदुरूस्तीस पात्र असल्यामुळे संस्थेने दोष दुरूस्ती करून नमूद दोषांची दुरूस्ती करणे अपेक्षित आहे. सदर संस्थेने दोष दुरूस्ती अहवाल पाठविला नसल्याने त्यास संस्थेचे संचालक मंडळ जबाबदार असल्याचा शेरा नमूद केला आहे.

श्री. एस. बी. देशमुख यांनी चाचणी लेखापरीक्षण हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८१(३) क नुसार तसेच चाचणी लेखापरीक्षण करण्यासाठी दिलेल्या परीपत्रकीय सुचनेनुसार केले असून सदर अहवालातील शेऱ्यावरूनच सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. केज यांनी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था

मर्या. उंदरी या संस्थेचे सचिव श्री. सुनिल ठोंबरे यांना रू.१५,०००/- एवढ्या रक्कमेचा दंड केला आहे. सदर चाचणी लेखापरीक्षण अहवालामध्ये परिशिष्ट अ मधील ०१ ते ०६ व परीशिष्ट ब मधील ०१ ते १० मुद्यांबाबत श्री. एस. बी. देशमुख यांनी सदर चाचणी लेखापरीक्षण अहवाल कलम ८१(३) (क) प्रमाणे दिलेला असून तो कायदेशीर आहे, असे चौकशी अहवालात स्पष्ट नमूद केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात 'एक जिल्हा, एक उत्पादन' ही योजना भौगोलिक मानांकन या नोंदणीकृत उत्पादनांना सर्व सोयीसुविधा मिळण्याबाबत

**(३२) ६८९५० (२४-०८-२०२३). श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विशिष्ट भौगोलिक क्षेत्राशी निगडीत शासनाची 'एक जिल्हा, एक उत्पादन' (ODOP) ही योजना भौगोलिक मानांकन प्राप्त (Geographical indication) आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत राज्यातील जिल्हानिहाय अंतिम करण्यात आलेल्या शेतीमाल व प्रक्रिया उत्पादनांना भौगोलिक मानांकनाचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष लाभ मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी 'एक जिल्हा, एक उत्पादन' ही योजना भौगोलिक मानांकन या नोंदणीकृत उत्पादनांना एकाच छताखाली सर्व सोयीसुविधा मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०८-११-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) अशी कोणतीही योजना शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बल्लारपूर (जि.चंद्रपूर) तालुक्यात भूमिधारी हक्कावर वाटपात मिळालेल्या जमिनीची तपासणी मोहिम सुरु असल्याबाबत

**(३३) ६९०११ (३१-०८-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.माधवराव पवार (हदगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: बल्लारपूर (जि.चंद्रपूर) तालुक्यात भूमिधारी हक्कावर वाटपात मिळालेल्या जमिनीची शर्तभंग तपासणी मोहिम माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भूमिधारी हक्कावर जमिनी वाटप करण्यात आलेल्या जमीनधारकांच्या तपासणी मोहिमेस तहसील कार्यालयाने सुरुवात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जमिन धारकांनी शासनाची परवानगी न घेता जमिनीची विक्री केल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे ,

जिल्हाधिकारी, चंद्रपूर कार्यालयाचे दि.०३.०२.२०२३ च्या पत्रान्वये महाराजस्व अभियान अंतर्गत शर्तभंग प्रकरणे शोधुन कार्यवाही करणे बाबत सर्व तहसीलदार यांना कळविण्यात आले आहे.

(२), (३), (४), व (५) तलाठी यांचेकडुन प्राप्त एकुण २८ शर्तभंगातील प्रस्तावावर ज्या प्रकरणात शर्तभंग दिसुन आले आहेत. अशा प्रकरणात संबंधिताचे म्हणणे एकुन घेण्यासाठी तहसील कार्यालय, बल्लारपुर यांचे स्तरावर सुनावणी सुरु करण्यात आली असून, संबंधिताचे म्हणणे ऐकुन घेतल्यानंतर प्रकरणात शर्तभंग झाल्याचे निश्चीतपणे दिसुन आल्यास, अशा प्रकरणी प्रचलित धोरणातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करण्याची तजविज ठेवली आहे.

---

## भंडारा जिल्हयातील नदिकाठावरील पुराच्या पाण्याने दरवर्षी वेढणाऱ्या गावांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(३४) ६९११४ (०४-०९-२०२३). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयात पावसाळयात नदीकाठावरील १३० गावांचा पुराच्या पाण्यामुळे तालूका व जिल्हा मुख्यालयाशी सतत ३ महिने संपर्क नसल्याने गावांतील नागरीकांना पिण्याचे शुध्द पाणी, शिक्षण, आरोग्य व रोजगारांपासून मुकावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मान्सूनदृष्टया संवेदनशील १३० गावांतील नागरीकांना पावसाळयात मोठया प्रमाणात संकटाचा सामना करावा लागत असून, त्यापैकी अनेकांनी आपला जीव सुध्दा गमावला आहे, त्यामुळे या १३० गावांचे पुनर्वसन करण्याची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (०६-११-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

मौजे आवळी, ता. लाखांदूर, जि. भंडारा या गावाचे पावसाळयामध्ये मुख्यालयाशी संपर्क तुटत असल्याने या गावाचे मौजे इंदोरा येथे पुनर्वसन करण्यात आले आहे. या गावात पिण्याचे शुध्द पाणी, शिक्षण व आरोग्याच्या सोई सुविधा पुरविण्याचे काम सुरु आहे. याव्यतिरिक्त पावसाळण्यात कोणतेही गाव संपर्क विना नाही.

(२) व (३) भंडारा जिल्हयातील नदी काठावरील गावांमध्ये नदीचे पाणी शिरुन शेतीचे व घरांचे नुकसान होत. तसेच सन २०२० मध्ये ०२ व्यक्ती व सन २०२२ मध्ये ०१ व्यक्ती पुराच्या पाण्यात बुडून मृत पावले.

पुराचा धोका असलेल्या २२ आपत्ती प्रवण गावांच्या पुनर्वसनाचे प्रस्ताव मंत्रीमंडळ उपसमितीच्या निर्णयार्थ ठेवण्यासाठी प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## राजूर, (जि. अहमदनगर) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प , यांनी अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी योजनानिहाय मागविलेल्या अर्जांबाबत

**(३५) ६९१३७ (१०-१०-२०२३). श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.किरण लहामटे (अकोले) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजूर, (जि. अहमदनगर) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प, यांनी केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षासाठी अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी योजनानिहाय अर्ज दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मागविले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणत्या योजनेसाठी एकुण किती आदिवासी जमातीच्या लाभार्थ्यांनी अर्ज केले होते,

(३) असल्यास, यापैकी कोणत्या योजनांसाठी शासनाकडून निधी उपलब्ध करण्यात आला आहे व कोणत्या योजनांना निधी उपलब्ध करणे प्रलंबीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (३०-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेंतर्गत खालीलप्रमाणे गटनिहाय आदिवासी लाभार्थ्यांनी अर्ज केले होते.
गट अ - १५२८
गट ब - ९१८
गट क - ३७
शासनपत्र क्र. आविवि-२०२२/प्र.क्र.९५/का.०९ दि. ०२/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये गट ब प्रशिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या योजना वगळण्याचा निर्णय घेवून सदर प्रकल्पांतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरीता गट "अ" व "क" करीता रू. २,७७,९५,०००/- इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## चंद्रपूर जिल्ह्यात महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत शेतकऱ्यांना प्रोत्साहन निधी अप्राप्त असल्याबाबत

**(३६) ६९१५६ (२९-०८-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यात महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत दीड हजार शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण न झाल्याने निधी अप्राप्त असल्याची माहिती माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने आढावा घेऊन येथील शेतकऱ्यांचे आधार प्रमाणित करुन त्यांचा निधी त्यांच्या खात्यावर प्राप्त करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०८-११-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) सदर योजनेच्या संगणकीय प्रणालीवर सादर केलेल्या कर्ज खात्यानुसार संगणकीय संस्करणाची कार्यवाही सुरु असुन त्यानुसार योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना योजनेचा लाभ दिला जातो. त्यानुसार सदर योजनेअंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातील एकुण ४२,८९६ कर्जखाती प्राथमिकदृष्ट्या पात्र ठरविण्यात आली. त्यापैकी एकुण ४१,०८१ कर्जखात्यांचे आधार प्रमाणिकरण केले असून त्यापैकी ४०,७८० कर्जखात्यांना रु.१६६.३२ कोटी रकमेचा लाभ देण्यात आला आहे व उर्वरीत कर्जखात्यांना लाभ देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. सद्य:स्थितीत जिल्ह्यातील एकुण १८१५ कर्जखात्यांचे आधार प्रमाणीकरण बाकी आहे.
सदर योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांची विशिष्ट क्रमांकाची यादी स्थानिक वर्तमानपत्रामध्ये, गावामध्ये अथवा बॅंक शाखेमध्ये प्रसिद्ध करुन आधार प्रमाणीकरण करण्याबाबत शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे चामटोली (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील शेतकरी शेतजमिन खरेदी करुन त्या शेतजमिनीवर शेती करीत नसल्याबाबत

**(३७) ६९२६१ (२४-०८-२०२३). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शेतजमीन खरेदी करतांना खरेदीदार हा शेतकरीच असला पाहिजे व खरेदी केलेल्या शेतजमिनीचा वापर शेतीसाठी झाला पाहिजे असे काही बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे चामटोली (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील सव्हे नं. २६/१ व सव्हे नं. २६/२ ही शेतजमिन शेतकरी नसलेले टेमटन मीनु अंकलेसरीया या परिवाराने खरेदी केली आणि खरेदी केलेली शेतजमिनीवर शेती केली जात नसल्याची तक्रार समाजिक/पर्यावरण कार्यकर्ते श्री नंदकुमार पवार यांनी तक्रार करून सदरची शेतजमिन सरकारखाती जमा करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले,त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०८-११-२०२३) :** (१) होय. हे खरे आहे.
(२), (३) व (४) मौजे चामटोली, ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथील सव्हें नं. २६/९ व २६/२ ही शेतजमीन शेतकरी नसलेले टेमटन मोनू अंकलेसरीया या परिवाराने खरेदी केली आणि खरेदी केलेल्या शेतजमीनीवर शेती केली जात नसल्याची तक्रार करून सदरची शेतजमीन सरकार जमा करण्याची मागणी सामाजिक/पर्यावरण कार्यकर्ते श्री नंदकुमार पवार यांनी केली आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ६३ नुसार शेतजमीन न्यायाधिकरण अंबरनाथ यांचे न्यायालयात सुनावणी घेऊन तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण अंबरनाथ यांनी दिनांक ०५.१२.२०२२ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत.

स.नं.२६/१ व २६/२अ बाबत श्री. दिनेशचंद्र काला यांचे कडून सदर मिळकत ही श्री.टेमटन मिनू अंकलेसरीया यांनी खरेदीखताने खरेदी केलेली आहे. दिनेशचंद्र काला यांनी सदर मिळकत ही शोभा प्रभाकर जाधव व इतर यांचे कु.मु. प्रभाकर महादेव जाधव यांचेकडुन खरेदीने विकत घेतल्याचे दिसुन येते. दिनेशचंद्र काला हे शेतकरी नसल्याने तसेच शेतकरी असल्याचा पुरावा सादर न केल्याने कुळकायदा कलम ८४ क सुधारणा कायदा २०१६ नुसार बाजारभावाप्रमाणे जमिनीचे बाजारमुल्याच्या ५०% अनर्जीत रक्कम शासनजमा करावी असे तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण अंबरनाथ यांनी आदेश पारित केले आहेत.

तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण अंबरनाथ यांनी दिलेल्या आदेशाविरूद्ध श्री.टेमटन मिनू अंकलेसरीया यांनी उपविभागीय अधिकारी उल्हासनगर उपविभाग उल्हासनगर यांचे कार्यालयात अपिल दाखल केलेले होते. सदर अपिलाची सुनावणी सुरू असतानाच श्री.टेमटन मिनू अंकलेसरीया यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई यांचे न्यायालयात सिव्हील रिटपिटीशन दाखल केलेली होती.

मा.उच्च न्यायालयाने उपविभागीय अधिकारी यांचेकडे अपिल प्रलंबित असल्याने दोन आठवडयात त्यांना निर्णय देण्याचे सांगून अपिल disposed केले.

मा. उच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर, उपविभाग उल्हासनगर यांनी तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण अंबरनाथ यांचे आदेश दिनांक ०५/१२/२०२२ गुणवत्तेनुरूप निर्णय घेऊन रद्द केले आहेत.

तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर उपविभाग उल्हासनगर यांचे कार्यालयात सुनावणी घेऊन तक्रारदार श्री.नंदकुमार पवार व सामनेवाले यांना समक्ष संधी देण्यात आली आहे व योग्य ते निर्णय पारित करण्यात आलेले आहेत.

---

### कोकणातील दरडग्रस्त आणि वादळात सापडणारी गावातील मानवी जीवनावर होणारा परिणाम रोखण्यासाठी आराखडा तयार करण्याबाबत

**(३८) ६९५७६ (२७-०८-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील सुमारे १०५० गावांवर दरडीचा धोका असून पालघरची भूकंपग्रस्त गावे आणि रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड या तीन जिल्ह्यातील दरडग्रस्त आणि वादळात सापडणारी गावे अशा गावातील मानवी जीवनावर होणारा परिणाम रोखण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने एकत्रित येऊन १० हजार कोटी खर्चाचा नवा आराखडा तयार करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आराखड्यात रत्नागिरी जिल्ह्यातील ६१२, सिंधुदर्ग जिल्ह्यातील १७८, रायगड जिल्ह्यातील ३४१ आणि पालघर जिल्ह्यातील भूकंपग्रस्त भागाचा समावेश आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त आराखड्यांचे एकंदर स्वरुप काय आहेत व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (०९-११-२०२३) :** (१), (२) व (३ ) होय, हे अंशत: खरे आहे.
कोकण विभागामध्ये उद्भवणाऱ्या आपत्तीचे सौम्यीकरण होण्याच्या दृष्टीने तसेच भविष्यात होणारी जिवित व वित्त हानी कमी करण्यासाठी वा टाळण्यासाठी कोकण विभागातील पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्हयांसाठी सौम्यीकरणांतर्गत ३२०० कोटी रु. चा आराखडा कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पांतर्गत तयार केला आहे. यामध्ये खार प्रतिबंधक बंधारे, धूप प्रतिबंधक बंधारे, भूमीगत विद्युत वाहिन्या, बहुउद्देशिय चक्रीवादळ निवारा केंद्रे, तसेच दरडप्रतिबंधात्मक उपाय योजना या कामांचा यामध्ये समावेश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटी दूर करुन नियमावली करण्याबाबत

**(३९) ६९८१५ (११-०९-२०२३). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील रोजगार हमी योजनांची मागणी होळीनंतर वाढत असून खरीपाची कामे सुरु होऊन कमी होत असतानाही खूपच कमी जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची कामे सुरु झाल्याचे माहे एप्रिल व मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यातील ११ जिल्ह्यात चक्क शुन्य कुटूंबे काम करताना दिसत असून फक्त ९ जिल्ह्यात १०० हून अधिक कुटूंबे कामांवर जात असल्याचे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या वेबसाईट वरची आकडेवारी पाहता स्पष्ट दिसून येत आहे तसेच मागील पाच वर्षात माहे मे महिन्यात जेथे ४ ते ८ लाख कुटूंबे कामावर होती तिथे आज ४ हजार सुद्धा कामावर नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी अंमलबजावणीतील तरतुदीत काही बदल केल्याने तालुक्याच्या गट विकास अधिकाऱ्यांनी (बिडीओ) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे काम करण्याबाबत नाराजी व्यक्त केली असून काम हाती घेणार नाही, असे सांगितले असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटी दूर करण्यासाठी उक्त योजनेच्या उद्दिष्टांना धरुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०८-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे. गटविकास अधिकारी यांनी एप्रिल महिन्यात मगांराग्रारोहयोच्या कामांवर बहिष्कार टाकला होता. तथापी त्यांनी त्यांचा बहिष्कार मागे घेतल्यानंतर आता परत मगांराग्रारोहयोची कामे त्यांच्या देखरेखीखाली होत आहेत.
(४) व (५) शासनाच्या दिनांक २८.०४.२०२३ परिपत्रकानुसार मग्रारोहयो अंतर्गत मजुरांचे अनुपस्थितीबाबत अथवा त्याचे सत्यतेबाबत पंचायत समितीस्तरावरील गट विकास अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येणार नसल्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे.

---

## अकोला येथे कृषी विभागाच्या गुणवत्ता नियंत्रण पथकाकडून लाखो रुपयांची मागणी केल्याबाबत

**(४०) ६९९५३ (२८-०८-२०२३). डॉ.राजेंद्र शिंगणे (सिंदखेड राजा), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.शेखर निकम (चिपळूण), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील कृषी विभागाच्या गुणवत्ता नियंत्रण विभागाच्या पथकाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ भागातील कृषी निविष्ठांच्या अनेक गोदामांवर तपासणी करण्यासाठी धाड टाकून काही गोदामे सिल केली असल्याचे दिनांक १२ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच या धाडीच्या वेळी एक माजी जिल्हा परिषद सदस्य व कृषी विपणन क्षेत्राशी निगडीत व्यक्ती बेकायदेशीररित्या हजर होते, त्याचप्रमाणे सदर व्यक्तीवर नागपूर येथे कृषी निविष्ठांचे संदर्भांत गुन्हा दाखल आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तपासणी सुरु असताना पथकातील काही अधिकाऱ्यांनी गोदाम व्यवस्थापकाला दमदाटी करुन प्रवेश केला तसेच बायोपेस्टीसाईड व अन्य साहित्यांची अधिकाऱ्यांसमोर नासधूस केल्याचाही प्रकार निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या पथकातील सदस्यांमध्ये कृषी मंत्र्यांचे स्वीय सहायक व नागपूर येथील स्वीय सहायक यांचा समावेश असून सदर पथकाने ५ लाख रुपयांची मागणी केल्याचा आरोप अक्षत फर्टीलायझरच्या व्यवस्थापक यांनी केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) त्याचप्रमाणे कृषी आयुक्तालयाचे गुणनियंत्रण विभागाच्या भरारी पथकाची अशी कार्यवाही सुरु असताना कृषी मंत्र्याच्या विशेष कार्य अधिकारी आणि स्वीय सहायक यांनी खाजगी व्यक्तींच्या समवेत गोडाऊनवर धाडी टाकल्याने यामध्ये आर्थिक हितसंबध गुंतल्याचे दिसून येते, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधीत दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०८-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.

एम.आय.डी.सी. अकोला येथील कृषि निविष्ठा साठवणूक केंद्रांची दिनांक ०७/०६/२०२३ ते दिनांक ०९/०६/२०२३ या कालावधीत तपासणी मोहिम कृषि आयुक्तालयाकडून राबविण्यात आली होती.

(२) हे खरे नाही.

विविध जिल्हयातील कृषि विभागाच्या एकूण ४६ गुणनियंत्रण निरिक्षकांची १४ पथके तयार करण्यात आली होती. एका तपासणी पथकामध्ये तीन गुणवत्ता नियंत्रक निरीक्षकांचा समावेश असून, कृषि विभागाच्या गुणवत्ता नियंत्रक निरीक्षकांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तींचा समावेश पथकात करण्यात आलेला नव्हता.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) हे खरे नाही. एका तपासणी पथकामध्ये तीन गुणवत्ता नियंत्रक निरीक्षकांचा समावेश असून, कृषि विभागाच्या गुणवत्ता नियंत्रक निरीक्षकांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तींचा समावेश पथकात करण्यात आलेला नव्हता. तपासणी पथकाकडून कोणत्याही प्रकारची मागणी केल्याबाबतची तक्रार कृषि विभागास प्राप्त झालेली नाही.

(६) सदर पथकांमार्फत एकूण ५० साठवणूक केंद्रांची तपासणी करण्यात आली. तपासणीमध्ये एकूण ४४ प्रकरणी रु. २३४७.१८ लाख रकमेच्या साठयास विक्रीबंद आदेश देण्यात आले होते. सदर मोहिमेंतर्गत एकूण १७९ नमुने विश्लेषणाकरीता घेण्यात आले होते. यापैकी २ नमुने प्रयोगशाळेने नाकारले. त्यामुळे १७७ नमुन्यांचे विश्लेषण पूर्ण झालेले असून, त्यामध्ये २९ नमुने अप्रमाणित व १४८ नमूने प्रमाणित आढळून आलेले आहेत. अप्रमाणित आढळून

आलेल्या नमुन्यांचे अनुषंगाने संबंधित उत्पादक/ वितरक/ साठवणूक केंद्र यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली असून, ७ अप्रमाणित नमुन्यांविरुध्द पोलीस गुन्हे व १३ अप्रमाणित नमुन्यांविरुध्द न्यायालयीन दावे दाखल करण्यात आले आहेत.

तसेच, तपासणीमध्ये आढळून आलेल्या उणीवा/ त्रुटींचे अनुषंगाने, एम.आय.डी.सी. अकोला येथे अनधिकृत ठिकाणी विना परवाना किटकनाशकांची व खतांची साठवणूक व विक्री केल्याने, मे. कर्नाटका ॲग्रो इन्सेक्टिसाईड्स प्रा.लि., बंगलोर व मे. कर्नाटका ॲग्रो फर्टिलायझर प्रा.लि. बंगलोर यांचा अनुक्रमे ३४११ कि.ग्रॅ. किटकनाशकाचा साठा अंदाजित किंमत रु. ७.८४ लाख व १,५६९ मे. टन खताचा साठा अंदाजित किंमत रु. १२.३८ लाख जप्त करण्यात आलेला असून पोलीस स्टेशन, एम.आय.डी.सी. अकोला येथे दिनांक १०.०६.२०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. ४४ विक्रीबंद आदेश देण्यात येऊन विश्लेषणाअंती अप्रमाणित आढळून आलेल्या नमुन्यांचे अनुषंगाने संबंधित उत्पादक/वितरक/ साठवणूक केंद्र यांना कारणे दाखवा नोटीस बजाऊन, पुढील कार्यवाही सुरु आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गडचिरोली जिल्ह्यात बुरुड व करंडी समाजास बांबू मिळत नसल्याने आर्थिक संकटात सापडल्याबाबत

**(४१) ७०१३७ (२७-०८-२०२३). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात बुरुड व करंडी समाजात बांबूपासून विविध प्रकारच्या टोपल्या व कृषी उपयोगी वस्तू तसेच अनेक कलात्मक वस्तू तयार करण्याचा व्यवसाय वर्षानुवर्षे करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी मागील काही महिन्यापासून समाजाला बांबू मिळत नसल्याने त्यांच्यावर मोठे आर्थिक संकट कोसळले असून त्यांच्या उपजिविकेचा व्यवसायच बंद पडल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समाज बांधवांचा व्यवसाय बंद होण्याची वेळ येऊ नये याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३१-१०-२०२३) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही, यासंदर्भात विदर्भ विकास बांबु कामगार संस्था, देसाईगंज यांचे दि.१३.१२.२०२२ रोजीचे निवेदन वनसंरक्षक (प्रा.) गडचिरोली यांचे कार्यालयास प्राप्त झाले. सदर निवेदनाच्या अनुषंगाने उपवनसंरक्षक (प्रा.) वडसा यांनी गोंदिया वनविभाग यांचेकडून बुरड बांबु व्यावसायिकांना त्यांच्या मागणीनुसार सन २०२१-२२ ते ऑगस्ट, २०२३ पर्यंत ८५८६३ नग बांबुचा पुरवठा केलेला आहे.

(३) व (४) दिनांक ३०.०५.१९९७ च्या शासन निर्णयान्वये विदर्भातील नोंदणीकृत बुरड बांबु कामगारांना प्रति कुटुंब प्रति वर्षी १५०० बांबुचा पुरवठा निस्तार दराने करण्याचे स्पष्ट आदेश आहेत. तसेच महाराष्ट्र लोकसेवा हमी अध्यादेश २०१५ नुसार नोंदणी केल्यानुसार प्रकरणाला १५ दिवसात मंजुरी प्रदान करण्याबाबतच्या सूचना आहेत.

नोंदणीकृत बुरुड कारागीरांना त्यांचे मागणीनुसार निस्तार दाराने बांबुचा पुरवठा करण्यात येत आहे. ऑगस्ट, २०२३ अखेरपर्यंत एकूण ९४९०१ नग बांबूचा पुरवठा बुरड बांबूधारक तसेच कास्तकारांना निस्तार दराने करण्यात आलेला आहे.

---

### हिंगणा ( जि.नागपूर) येथील बुटीबोरी शहरास अप्पर तहसिल कार्यालय सुरू करण्याबाबत

**(४२) ७०२०१ (२५-०८-२०२३). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणा (जि.नागपूर) येथील बुटीबोरी शहरास नगर परिषदेचा दर्जा असून शहराच्या जवळपास २५ ते ३० गांवे असून

त्या भागातील नागरीक व संस्थांकडून तहसिल कार्यालयास नागपूर ग्रा. यांचे अधिनस्त बुटीबोरी येथे अप्पर तहसिल कार्यालय सुरू करण्याबाबत महसूल मंत्री यांना लोकप्रतिनिधीनीं दिनांक १२ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र देण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अप्पर तहसीलदार बुटीबोरी कार्यालयाची निर्मिती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०८-११-२०२३) :** (१) होय.
(२) अपर तहसिल कार्यालय निर्मितीबाबत विभागाच्या प्रचलित पध्दतीनुसार संबंधित विभागीय आयुक्तांकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यावर विभागाचे मंत्री व मा.मुख्यमंत्री यांची तत्वत: मान्यता घेवून प्रस्तावास वित्त विभागाने गठित केलेली उप समिती व त्यांनी केलेल्या शिफारशीनुसार उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेण्यात येते. सदर मान्यता प्राप्त झाल्यानंतर अपर तहसिल कार्यालयाचे कार्यक्षेत्र व पदनिर्मितीबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात येतो.
बुटीबोरी जि.नागपूर येथे अपर तहसील कार्यालय स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, नागपूर विभाग यांच्याकडून दिनांक २६.०९.२०२३ च्या पत्रान्वये प्राप्त झाला आहे. तसेच, महसूली कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात फेरबदल/ नवीन कार्यालय निर्मिती व महसूली कायद्यांमध्ये आवश्यकतेनुसार बदलांबाबत शिफारशी करण्याकरीता दिनांक २५.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठित करण्यात आली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील तीन तालुक्यातच ठक्कर बाप्पा योजनेअतर्गत १२ कोटीच्या निधीचे वाटपझाल्याबाबत**

**(४३) ७०२७७ (१०-१०-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील सर्व तालुक्यात आदिवासी नागरिकांचे वास्तव्य असून त्यांच्या परिसरातील विकासासाठी राज्य आदिवासी विकास विभागाकडून ठक्कर बाप्पा योजनेतून निधी वाटप केला जात असतो मात्र चंद्रपूर जिल्हयात १५ तालुके असताना फक्त बल्लारपूर, पोंभुर्णा व मूल या तीनच तालुक्यात ठक्कर बाप्पा योजने अंतर्गत ११ कोटी ६५ लक्ष रूपयांचा निधी देण्यात आला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चंद्रपूरचे सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी यांनी दिंनाक २५ मार्च २०२३ रोजी चंद्रपूर जिल्हयातील ८ तालुकयातील १३४ गावांच्या २३७ कामासांठी २२ कोटी ६० लक्ष ७५ हजार रुपये निधीची मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले ,
(४) असल्यास, चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही तालुक्यासह ईतर तालुक्यांना ठक्कर बाप्पा योजनेअंतर्गत विकास कामाकरिता निधी उपलब्ध होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (३०-१०-२०२३) :**(१), (२), (३), व (४) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, दि.०३ फेब्रुवारी २०२३ अन्वये ठक्कर बाप्पा योजना सुधारित करण्यात आली असून सदर योजना सन २०२२-२३ पासून जिल्हास्तर व राज्यस्तरावरुन राबविण्याबाबतच्या सुधारीत मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत. प्रकल्प कार्यालय, चंद्रपूर अंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातील १० तालुके तर प्रकल्प कार्यालय, चिमूर अंतर्गत ५ तालुके कार्यरत आहेत. प्रकल्प अधिकारी, चंद्रपूर यांनी दि. ३०/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये चंद्रपूर जिल्ह्यातील ८ तालुक्यातील रू. २० कोटी ३१ लक्ष ७५ हजार रकमेचा प्रस्ताव राज्यस्तरावरून मंजुरीस्तव शासनास सादर करण्यात आलेला होता. त्यानुषंगाने चंद्रपूर जिल्ह्यातील ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेंर्गत सन २०२३-२४ मध्ये दि. ०६/०६/२०२३ रोजीच्या शासन

निर्णयान्वये चंद्रपूर, बल्लारपूर, पोंभूर्णा व मूल या ४ तालुक्यांमधील रू. ११६५.२५ लक्षच्या १२६ कामांना राज्यस्तरावरून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. याशिवाय जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम सन २०२२-२३ या वर्षाकरीता चंद्रपूर प्रकल्पांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांचे दि. ३०/३/२०२३ रोजीच्या आदेशान्वये चंद्रपुर प्रकल्पांतर्गत १० तालुक्यांमधील रू.१,१५,९२,०००/- इतक्या रकमेच्या ३० कामास व चिमुर प्रकल्पांतर्गत ५ तालुक्यांमधील रू.७८,६१,०००/- रकमेच्या २५ कामास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तसेच ठक्कर बाप्पा ही वस्तीसुधार योजना ही नियमित योजना असून सुधारित मार्गदर्शक सुचनांनुसार सदर योजनेंतर्गत दरवर्षी उपलब्ध होणा-या निधीतून आदिवासी वस्ती/गावांतर्गतची विकास कामांना राज्यस्तर व जिल्हास्तरावरुन मान्यता देवून निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी विकास आयुक्त (जि.अमरावती) येथील आदिवासी विकास विभाग प्रकल्प कार्यालयामार्फत केलेल्या बदल्यांमध्ये अनियमितता झाली असल्याबाबत

**(४४) ७०२९३ (१०-१०-२०२३). डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अप्पर आयुक्त आदिवासी विकास कार्यालय (जि.अमरावती) येथील अधिनस्त असलेले ७ आदिवासी विकास विभाग प्रकल्प कार्यालय अंतर्गत कार्यरत असलेल्या कर्मचारी व शिक्षकांच्या दिनांक ३१ मे, २०२३ रोजी करण्यात आलेल्या बदल्यांमध्ये अनियमितता झाली असल्याचे दिनांक १२ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास बदली मध्ये समुपदेशन न करता १० ते १२ वर्षापासून एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या कर्मचारी यांची प्रकल्पाबाहेर बदली न करता आणि काही कर्मचारी यांना ईच्छुक ठिकाणी बदली देवून अनियमितता केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने समुपदेशन न करता बदल्या करून अनियमितता केलेल्या संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (०३-११-२०२३) :** (१) हे, खरे नाही.

(२) बदली अधिनियम व शासन निर्णयातील तरतुदीनुसार बदली प्रक्रिया नियमानुसार राबविण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोमठाना (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील शेतकऱ्यांना छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेतील पात्र कर्जदारांना कर्ज माफीचा लाभ मिळण्याबाबत

**(४५) ७०३७१ (२७-०८-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोमठाना (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील श्रीमती सिंधुबाई रामभाऊ झगरे व श्री.गणेश रामराव झगरे व इतर शेतकऱ्यांनी कर्ज काढलेले असून ते छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेतील पात्र असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नावे छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेच्या कर्ज माफीच्या पात्र लाभार्थींच्या यादीत नाव असताना देखील त्यांना अद्यापपर्यंत कर्ज माफीचा लाभ मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात कर्ज माफीचा लाभ देण्यात यावा अशी मागणी त्यांनी जिल्हा उपनिबंधक, बुलढाणा यांच्याकडे दिनांक ४ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार वंचित व पात्र शेतकऱ्यांना उक्त योजनेचा लाभ मिळण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०८-११-२०२३) :**(१) व (२) हे खरे आहे.
(३) श्रीमती सिंधुबाई रामभाऊ झगरे व श्री. गणेश रामराव झगरे यांचा दि. ०४.०३.२०२० रोजीचा अर्ज सहायक निबंधक, चिखली यांच्या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.
(४) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ अंतर्गत पात्र असणाऱ्या एकुण ४४.०४ लाख कर्जखात्यामध्ये रक्कम रु. १८,७६२ कोटी वितरीत करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत सदर योजनेच्या संगणकीय प्रणालीचे (पोर्टल) कामकाज सुरु करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच सदर योजनेची पुढील कार्यवाही अंदाजे १५ आठवड्यांत सुरु करण्यात येणार असुन त्यानंतर उर्वरीत पात्र कर्जखात्यांना योजनेचा लाभ दिला जाणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) येथे वनपरिक्षेत्र व खर्डीचे वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी लाकडांची चोरी करुन वाहतूक करणारे आठ ट्रक पकडल्याबाबत

**(४६) ७०३९३ (११-०९-२०२३). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) येथे वन विभागाच्या कार्यक्षेत्रातील वनपरिक्षेत्र अधिकारी शैलेश गोसावी व खर्डीचे वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लाकडांची चोरी करुन वाहतूक करणाऱ्या आठ जणांचे ट्रक पकडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर लाकडाचे ट्रक व मालकांवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-११-२०२३) :** (१) शहापूर वनविभागातील वनपरिक्षेत्र खर्डी मधील परिमंडळ काष्टी येथे दि. १३.०५.२०२३ रोजी विना वाहतुक करणारे ०७ ट्रक व शहापूर वनपरिक्षेतील परिमंडळ आटगाव येथे ०१ ट्रक असे एकूण ८ वाहने काष्ट विक्री आगार आसनगाव, ता. शहापुर, जि. ठाणे येथे मालासह जमा करण्यात आले.
(२) याबाबत शहापूर वनविभागामार्फत चौकशी करण्यात आली असुन लाकडाचे आठही ट्रक जप्त करण्यात आलेले आहेत. सदर प्रकरणातील ८ आरोपींना दिनांक १४.०५.२०२३ रोजी मा.न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, शहापूर यांचे न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयामार्फत त्यांना जामिन मंजूर झाला आहे. सदर प्रकरणी पुढील चौकशी सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर येथे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कर्मचारी भरतीच्या प्रस्तावाबाबत

**(४७) ७०४७७ (२७-०८-२०२३). श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर येथे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने नाबार्डच्या निर्देशानुसार बँकेचे मुख्यालय व जिल्ह्यातील विविध शाखांमध्ये आवश्यक ११७२ कर्मचारी पदभरतीच्या आकृतीबंधापैकी संचालक मंडळाच्या बैठकीत ९५० कर्मचारी पदसंख्येच्या आकृतीबंधास माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मान्यता देण्यात येऊन सदर प्रस्ताव सहकार आयुक्त, पुणे यांच्याकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास मंजुरी मिळण्यासाठी बँकेचे चेअरमन व संचालक मंडळांनी दिनांक २९ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पत्राद्वारे पाठपुरावा केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावास मंजुरी देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०८-११-२०२३) :**(१) व (२) हे खरे आहे.
(३) सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातुर यांनी दि. २५.०९.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे अभिप्राय स्वरुप अहवाल सहकार आयुक्त कार्यालय, पुणे यांना पाठवला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने सहकार आयुक्त कार्यालय, पुणे यांच्या स्तरावर छाननी व पडताळणीची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी बाजारात लाखो क्विंटल साखरेचा काळाबाजार करुन आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(४८) ७०४९९ (११-०९-२०२३). श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांच्या यंदाच्या गाळप हंगामात गतवर्षीच्या तुलनेत साखर उताऱ्यात सर्वाधिक ५० कारखाने असलेल्या साखर उताऱ्यात सरासरी ८.९४ टक्के एवढा निचांकी होऊन उताऱ्यात प्रचंड घट झाल्याचे दिनांक ९ एप्रिल, २०१२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी साखर आयुक्तालय आणि साखर तज्ञांच्या मते ०.२० ते ०.२५ टक्क्यापर्यंत साखर उताऱ्यात घट होऊनही सोलापूर जिल्ह्याला लागून असलेल्या पुणे व नगर या दोन्ही विभागातील साखर कारखान्यांचा सरासरी उतारा सोलापूर पेक्षा एक ते दीड टक्क्याने जास्त असल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संबंधित कारखान्यांनी प्रत्यक्षात कागदोपत्री कमी साखर उतारा दाखवून बाजारात लाखो क्विंटल साखरेचा काळाबाजार झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व साखर कारखान्यांने एकूण किती क्विंटल साखरेचा काळाजार करुन आर्थिक गैरव्यवहार केल्याचे निष्पन्न झाले आहे काय तसेच दोषींविरुद्ध अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०१-११-२०२३) :**(१) हे खरे नाही.
(२) साखर आयुक्त, पुणे यांचे अहवालानुसार पुणे आणि अहमदनगर विभागातील हवामान आणि जमिनीचा पोत विचारात घेता,
तसेच आडसाली ऊस लागवडीचे प्रमाण सोलापूर जिल्हयापेक्षा जास्त असल्याने साखर उतारा त्या जिल्हयामध्ये सोलापूर जिल्हयापेक्षा नेहमी जास्त येतो.
मात्र पावसाअभावी सोलापूर जिल्हयातील ऊस कमी कालावधीचा असल्याने साखर उतारा पुणे / अहमदनगर या विभागापेक्षा सोलापूर जिल्हयात कमी दिसून येतो.
गाळपास येणाऱ्या ऊसाची प्रत व कारखान्याच्या मशीनरीची कार्यक्षमता, हे घटकही साखर उतारा बाबत महत्वाचे असतात
त्यानुसार गाळप हंगाम २०२२-२३ मध्ये पुणे व अहमदनगर विभागाचा सरासरी साखर उतारा अनुक्रमे ११.४९% व १०.७८% आहे.

(३) (४) व (५) कारखान्यांनी प्रत्यक्षात कागदोपत्री कमी साखर उतारा दाखवून बाजारात लाखो क्विंटल साखरेचा काळाबाजार
झाल्याची बाब निदर्शनास आली नसल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## ताडोबा (जि.चंद्रपूर) अंधारी व्याघ्र परिक्षेत्रात काम करणाऱ्या मजूरांना कमी प्रमाणात मोबदला मिळत असल्याबाबत

**(४९) ७०५८५ (११-०९-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताडोबा (जि.चंद्रपूर) अंधारी व्याघ्र परिक्षेत्रात येणाऱ्या बफर क्षेत्रात वन विभागाद्वारे मजूरांना बाबूंचे एक बंडल बनविण्यासाठी २४.३२ रुपये मजूरी ठरली असूनही ठेकेदाराकडून १८/- रुपये दिले जात असल्याचे तसेच चंद्रपूर क्षेत्रातील ५०० मजूरांना प्रतिदिन ६.३२ रुपये इतकी अत्यल्प मजूरी दिली जात असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात मजूरांनी मा.पालकमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना तक्रार दिली असता त्यांना ठेकेदार व वनविभागातील स्थानिक अधिकाऱ्यांकडून धमकविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी वन परिक्षेत्रातील अधिकारी व कर्मचारी यांना दोषी ठरविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदरील मजूरांना योग्य मोबदला मिळण्याबाबत तसेच मोबदला कमी देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही, वेतन मंडळ, गडचिरोली व चंद्रपूर येथील लांब बांबु व बांबु बंडल्स करीता निष्कासन मजुरीचे दर वनसंरक्षक (प्रा.) गडचिरोली यांच्या कार्यालयाने ठरविण्यात आलेल्या दरानुसार तोडीचा दर रु.५.५२ प्रति बांबू आहे. तसेच बांबु बंडल्स करीता दर रु.२४.३२ प्रति बंडल्स प्रमाणे निश्चित केलेला आहे. या दरानुसार अंदाजपत्रके मंजुर करुन मजुरांना मजुरी अदा करण्यात आली आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजा बोरीबारा (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील तलावाचे बुडीत क्षेत्रातील आदिवासी कोलाम समाजाचे पुनर्वसन करण्याबाबत

**(५०) ७०८४४ (०४-०९-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा बोरीबारा (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील तलावाचे बुडीत क्षेत्रात एकुण ३६ आदिवासी कोलाम समाजाचे कुटुंब राहत असून त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत अनेकदा मागणी करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील काळात अश्याच प्रकारे अतिवृष्टीमुळे तेथील ३६ कुटुंबाचे स्थलांतरण करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत जिल्हाधिकारी वर्धा, विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, यांनी दिनांक १० फेब्रुवारी, २०१४ व १२ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास महसुल व वन विभाग यांना तेथील कुटुंबाचे पुनर्वसन करण्याबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, येथील कुऱ्हा तलावाच्या भिंतीला दिनांक १७ जुलै, २०२२ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे तलावाच्या भिंतीला मोठ्या प्रमाणात भेगा पडल्यामुळे तेथे राहत असलेल्या कुटुंबांना धोका निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर आदिवासी कोलाम समाजाच्या कुटुंबांना पुर बाधित म्हणून पुनर्वसन करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (०६-११-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
मागील वर्षी अतिवृष्टीमुळे पुरग्रस्त कोलाम समाजाचे ३६ आदिवासी कुटूंबाचे पुनर्वसनाबाबत मागणी आहे.
(२) होय
(३) होय
(४) होय अंशत खरे आहे.
धरणाच्या पाळेवर काही ठिकाणी भेगा आढळल्या होत्या. त्यामुळे युद्ध पातळीवर दुरूस्ती व इतर कामे करण्यात आली असल्याने सध्यस्थितीत धरण सुरक्षित आहे.
(५) जलसंपदा विभागामार्फत धरणातील पाणी साठा कमी करण्याकरीता सांडव्याच्या वरच्या व खालच्या बाजूस एक ते दिड मीटर खोली पर्यंत नाली काढण्यात आली. तसेच धरण सुरक्षिततेच्या दृष्टीने सदर प्रकल्पावर धरण पातळीवरुन मुरुम टाकणे, धरणाच्य गाभा भागात Gunny Bags टाकून Loading Berms तयार करणे Toe Drain स्वच्छ करणे यासारखे आकस्मिक कामे त्वरीत करण्यात आले. सदर तलावाच्या दुरुस्तीचे कामे ही अतिवृष्टीच्या कालावधीत सुध्दा गुणवत्ता राखुन करण्यात आली असल्याने धरण सुरक्षित आहे. त्यामुळे पुनर्वसनाची आवश्यकता नसल्याचे शासनास कळविले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.